**NUTA BULLETIN**

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2018-2020

YEAR : 45) 1st November 2020 ( No. of Pages 12) ( No : 11

*मा. प्रधान सचिव, उच्च शिक्षण यांच्या माहितीसाठी २६ परिच्छेदांचे तपशीलवार टिपण*

# उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी डोक्याचा वापर करून निर्णय घ्यावा

## मा. उच्च न्यायालयाचे आदेश

## मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाशी विसंगत निर्णय घेतल्यास त्याची भारी किंमत मोजावी लागेल

**प्रा.बी.टी.देशमुख**

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

**संदर्भ** :- **(१)** मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक ३१ ऑगस्ट २०२० रोजी LD-VC-CW No. 1045 of 2020 या प्रकरणात दिलेला आदेश. **(२)** मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक १२ ऑक्टोबर २०२० रोजी Writ Petition ST. No.9649 of 2020 या प्रकरणात दिलेला आदेश. **(३)** मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी Writ Petition No.13166/2017 या प्रकरणात दिलेला आदेश. **(४)** मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १ जुलै २०२० रोजी SLP No.14703 of 2019 या प्रकरणात विशेष अनुमती याचिका फेटाळतांना दिलेला निर्णय. **(५)** मा. शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेला दिनांक २७ जून २०१३ रोजीचा शासननिर्णय. **(६)** मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाशी दिनांक १५ ऑक्टोबर २०२० रोजी दुपारी ४.३० वाजता झालेली चर्चा बैठक. **(७)** नुटाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण रघुवंशी यांनी प्रधान सचिव, उच्च शिक्षण यांना सादर केलेले दिनांक १४ ऑक्टोबर २०२० रोजीचे निवेदन.

**"We direct respondent Nos.1 and 2 to apply their mind to find out whether the controversy is covered by the decision of this Court and pass an appropriate order** which shall be communicated to the petitioner within a period of eight weeks from today. **If we find that the decision is contrary to the judgment delivered by this Court, heavy cost shall have to be imposed."**

*(See Order of the High Court referred at 1 above.)*

"In the meantime, we direct respondent nos.1 and 2 to consider the decision of this Court delivered in Writ Petition No.13166/2017 on 3/10/2018 and decision of the Apex Court in Special Leave Petition (Civil) No.1309/2020 and take a final decision in the matter and file an affidavit to that effect before this Court. **If we find that the decision to be taken by the respondent nos. 1 and 2 runs contrary to the decision of the Apex Court and this Court, heavy costs will be imposed."**

*(See Order of the High Court referred at 2 above.)*

**१.** दिनांक २३ ऑक्टोबर १९९२ ते ३ एप्रिल २००० या कालखंडात नियुक्त झालेल्या नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन लागू करण्याच्या संदर्भात उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी अतिशय विचित्र असे धोरण स्वीकारले असे दिसून येते. अशा अनेक शिक्षकांना कोणताही खळखळाट न करता जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आली. मात्र पुढे याबाबतीत '**आवड-निवड**' प्रकरण सुरू झाले. काही शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू होत नाही असे कळविण्यात आले. त्यामुळे त्या प्रत्येक शिक्षकाला मा. उच्च न्यायालयासमोर जावे लागले. मा. उच्च न्यायालयातून अनेक निर्णय झाल्यानंतर तेथे सुद्धा अधिकाऱ्यांनी '**आवड-निवड**' प्रकरण सुरू केले. मा. उच्च न्यायालयाच्या काही निर्णयांची अंमलबजावणी कोणताही खळखळाट न करता अधिकाऱ्यांनी केली. मात्र काही प्रकरणांत सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आल्या. याबाबतची माहिती संदर्भ क्रमांक ७ वरील निवेदनाच्या परिच्छेद ५ मध्ये नमूद आहे. ती पुढीलप्रमाणे :-

"**In f**act, the record further indicates that the Department of Higher Education has **adopted a 'pick and choose' approach** in this matter. Department has extended the benefit of Old Pension Scheme to several Non-NET/SET Lecturers by taking into consideration services from the date of their initial appointment. But the same benefit was denied to so many of similarly situated teachers. It is quite clear that the **Department of Higher Education has again adopted a 'pick and choose' approach** in the matter of challenges to the decisions of the

*या निमित्ताने मा. प्रधान सचिव, उच्च शिक्षण यांच्या हे लक्षात आणून देण्यात येत आहे की, मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ च्या निर्णयाने* ***"याचिकाकर्ते लाभान्वित होतात किंवा नाही?"*** *या प्रश्नाचा निर्णय त्यांना करावयाचा नसून* ***"त्या निर्णयाने वाद विषय संपुष्टात आलेला आहे किंवा नाही?"*** *याबाबतचा निर्णय मा.प्रधान सचिवांना करावयाचा आहे.*

*(२६ परिच्छेदांचे तपशीलवार टिपण - परिच्छेद १९ पहा)*

High Courts in favour of the teachers. In some cases, the Department has challenged the decisions of the High Courts before Apex Court but in others, the decisions have been implemented without demur."

**२.** वस्तुतः यातील संदर्भ क्रमांक ३ वर नमूद केलेला मा. मुंबई उच्च न्यायालयाचा या प्रकरणातील पहिला निर्णय हा जर अधिकाऱ्यांनी काळजीपूर्वक वाचला असता तर तो धोरणात्मक निर्णय आहे, हे त्यांच्या लक्षात आले असते. **मा. उच्च न्यायालयाचे व सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय न वाचता, त्याचा अर्थ समजून न घेता, राज्यशासनाच्या अशा तीन विशेष अनुमती याचिका मा. सर्वोच्च न्यायालयात फेटाळण्यात आल्यानंतरसुद्धा एक एका शिक्षकाला न्यायालयात पाठविण्याचा ठोकळेबाज छळवाद अधिकाऱ्यांनी सुरूच ठेवला.**

***मा. उच्च न्यायालयाचा पहिला धोरणात्मक निर्णय***

**३.** नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनीच पेन्शन योजना लागू राहील, याबाबतीत संदर्भ क्रमांक ३ वरील पहिला निर्णय हा दिनांक **३ ऑक्टोबर २०१८** रोजी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने सन २०१७ च्या याचिका क्रमांक १३१६६ मध्ये दिलेला आहे. मा. खंडपीठाने आपल्या या निर्णयाच्या परिच्छेद ७ मध्ये शासनाचा २७ जून २०१३ चा संपूर्ण शासननिर्णय शब्दशः उधृत केलेला आहे व त्याबाबतचे खंडपीठाचे मत परिच्छेद ८ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद केलेले आहे. :-

**"It can be thus seen that vide aforesaid G.R., the State Government has exempted the lecturers who are appointed between 23/10/1992 to 03/04/2000 and who were not possessing the net-set examination,** M.Phil. and Ph.D.qualification. Only requirement is that the appointment of these lecturers is required to be made after following due selection process. The other requirement is that appointment of such lecturers ought to have been approved by the University and University should have submitted the proposal for grant of approval of such teachers to the University Grant Commission."

**४.** या शिक्षकाची सेवा त्याच्या नेमणुकीच्या दिनांकापासून धरण्यात यावी असे मा.उच्च न्यायालयाच्या या आदेशाच्या परिच्छेद ९ मध्ये नमूद आहे. ते पुढील शब्दात :-

"Undisputedly, the Petitioners' appointment was made after following due selection process. Not only University as well as the Respondent -Joint Director of Education had also granted approval to the appointment of the Petitioner. **As such, it can be clearly seen that the Petitioner is entitled to the benefits of the said G.R. Undisputedly, the Petitioner's date of appointment is 20/9/1999 i.e. the date which falls between 23/10/1992 to 03/04/2000."**

**५.** शेवटी मा. खंडपीठाने या प्रकरणी पुढीलप्रमाणे आदेश पारित केले:-

**"ORDER**

(i) The impugned order dated 17/04/2017 is quashed and set aside.

(ii) The Respondents are directed to make the pension applicable to the Petitioner on the basis of his last drawn salary.

(iii) The pension is to be paid to the Petitioner from the month of November 2018. All the arrears between the date of superannuation till 31/10/2018 shall be cleared within a period of 3 months from today." *(P121NB2018)*

***मा. सर्वोच्च न्यायालयाचा पहिला निर्णय***

**६.** नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या सेवा दिनांक २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाने नियमित केल्या म्हणजे काय केले? याबाबतच्या मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठांनी दिलेल्या निर्णयाकडे दुर्लक्ष करून राज्यशासनाने सर्वोच्च न्यायालयात दाखल

***प्रा.बी.टी.देशमुख,***

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

**३, सुबोध कॉलनी, विदर्भ महाविद्यालय रोड, अमरावती - ४४४ ६०४**

फो. नं. ०७२१-२५३००८० मो.नं. ९८९०९०९७०१

***दिनांक :- १९ ऑक्टोबर २०२०***

**प्रति,**

**मा. प्रधान सचिव,** उच्च शिक्षण,

महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

**मार्फत :** सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती

**विषय :** "नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा धोरणात्मक शासननिर्णय निर्गमित करणे" या विषयावरील २६ परिच्छेदांचे तपशीलवार टिपण.

मा. महोदय,

विषयोक्त बाबीवर तपशीलवार माहिती देणारे २६ परिच्छेदाचे तपशीलवार टिपण मी आपणास सादर करीत आहे. त्यावर यथोचित विचार होऊन योग्य ती कारवाई व्हावी, अशी विनंती आहे.

आपला विनीत,

प्रा.बी.टी.देशमुख,

माजी विधानपरिषद सदस्य

**सहपत्र :** "नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा धोरणात्मक शासननिर्णय निर्गमित करणे" या विषयावरील २६ परिच्छेदांचे तपशीलवार टिपण.

**पत्राची प्रतिलिपी :-** मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांना समादराने अग्रेषित

It is not in dispute that the facts involved in this petition are identical to those involved in Writ Petition No. 13166 of 2017 which has been decided on 3.10.2018 by the Division Bench of this Court at main seat. **The said judgment has been confirmed by the Hon'ble Apex Court in SLP (C) No. 14703/2019 on 1.7.2019** when it dismissed the same.

*(मा. उच्च न्यायालयाचा निर्णय – २६ परिच्छेदांचे तपशीलवार टिपण – परिच्छेद १२ (६) पहा)*

केलेली पहिली विशेष अनुमती याचिका (SLP) सर्वोच्च न्यायालयाने 'डिसमिस' केली. त्याचे तपशील पुढीलप्रमाणे :- **(1) SLP No :** Special Leave Petition (Civil) Diary No(s).14703/2019. **(2) Arising out of** impugned final judgment and order dated 03-10-2018 in WP No. 13166/2017 passed by the High Court of Judicature at Bombay. **(3)** The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) **Versus** Maruti Dattatraya Patil & Ors. Respondent(s) **(4) Date of Order :** 01-07-2019. **(5) Coram :** Hon'ble Dr. Justice D.Y. Chandrachud Hon'ble Ms. Justice Indira Banerjee. **(6) Order :** Delay condoned. **In the facts and circumstances of the present case and since the services of the first respondent were duly approved, we see no reason to entertain the Special Leave Petition.** The Special Leave Petition is accordingly dismissed. Pending application, if any, stands disposed of. *(P117NB2019)*

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशातील ठळकपणे दाखविलेला मजकूर पाहिला तर मा. सर्वोच्च न्यायालयाने कारणे नमूद करून एसएलपी डिसमिस केली, हे लक्षात येईल.

### मा. उच्च न्यायालयाचा दुसरा निर्णय

७. नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असे आदेशित करणारा दुसरा निर्णय सन २०१७ च्या याचिका क्रमांक १२१९ मध्ये दिनांक १९ ऑक्टोबर २०१८ रोजी मा.मुंबई खंडपीठाने दिला. पहिल्या निर्णयाचा स्पष्ट उल्लेख या दुसऱ्या निर्णयामध्ये करण्यात आला असून त्या सारखेच हे प्रकरण असल्याचे खंडपीठाने या निर्णयाच्या परिच्छेद तीन मध्ये नमूद केलेले आहे. ते पुढील शब्दात :-

"(3) **The facts in the present case are almost identical with the facts in Writ Petition No.13166 of 2017,** which has been allowed by Division Bench of this Court vide judgment dated 3rd October 2018. We therefore find it appropriate to allow this Petition in the light of the judgment of the Division Bench dated 3rd October 2018 passed in Writ Petition No.13166 of 2017." *(P137NB2018)*

### मा. उच्च न्यायालयाचा तिसरा निर्णय

८. नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असे आदेशित करणारा तिसरा निर्णय मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक १२ डिसेंबर २०१८ रोजी सन २०१६ च्या याचिका क्रमांक १३०४ मध्ये दिला, असे दिसून येते. *(P25NB2019)* या निर्णयामध्ये मा.खंडपीठाने दिनांक २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाचा अर्थ मा.मुंबई खंडपीठाने पहिल्या निर्णयान्वये निश्चित करून दिलेला आहे असे स्पष्ट शब्दात नमूद केले ते पुढीलप्रमाणे :-

**"Government Resolution dated 27th June, 2013 has been interpreted by this Court at its Principal Seat in Writ Petition No. 13166 of 2017 under order dated 03rd October, 2018."**

८.१ पहिल्या निर्णयात मा.मुंबई खंडपीठाने काय निश्चित केलेले आहे? हेही या निर्णयात मा.खंडपीठाने नमूद केले आहे ते पुढील शब्दात :-

**"It has been held by this Court that as per the said Government Resolution, the State Government has exempted the lecturers appointed between 23rd October, 1992 to 03rd April, 2000 from possessing the NET/SET qualification.** Appointment of the husband of the petitioner appears to have been approved even exemption has been granted by the University Grants Commission."

८.२ दिनांक २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाने या शिक्षकांच्या सेवा नियमित केलेल्या असल्यामुळे या शासननिर्णयाप्रमाणे कुटुंब निवृत्ती वेतन लाभार्थ्यांना सुद्धा जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असेही या निर्णयात नमूद केले आहे ते पुढील शब्दात :-

"**The said Government Resolution would apply to the husband of the petitioner. The date of death and/or retirement would not make any difference.**" *(P25NB2019)*

### मा. उच्च न्यायालयाचा चौथा निर्णय

९. नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असे आदेशित करणारा चौथा निर्णय विजयकुमार रणपिसे विरुद्ध महाराष्ट्र शासन या सन २०१९ च्या याचिका क्रमांक ७५५ मध्ये दिनांक ९ एप्रिल २०१९ रोजी मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिला. *(P103NB2019)* हा वादग्रस्त विषय राहिलेला नाही. मुंबई खंडपीठाने ३ ऑक्टोबर २०१८ रोजी सन २०१७ च्या याचिका क्रमांक १३१६६ मध्ये हा वाद निकाली काढलेला आहे व ज्या खंडपीठाने हा प्रश्न निकाली काढला त्या खंडपीठात जे ज्येष्ठ न्यायमूर्ती होते तेच ज्येष्ठ न्यायमूर्ती आज या खंडपीठात आहेत असा स्पष्ट उल्लेख या निर्णयाच्या परिच्छेद ८ मध्ये आहे तो पुढील शब्दात:-

"**The issue is no more res integra.** The Division Bench of this Court of which one of us (Gavai, J) was a party, through judgment and order dated 3rd October 2018 in Writ Petition No.13166/2017 (Maruti Dattatraya Patil Vs. The State of Maharashtra and ors.), has observed thus :

*"8. It can be thus seen that vide aforesaid G.R., **the State Government has exempted the lecturers who are appointed between 23/10/1992 to 03/04/2000 and who were not***

**The issue is no more res integra.** The Division Bench of this Court of which one of us (Gavai, J) was a party, through judgment and order dated 3rd October 2018 in Writ Petition No.13166/2017, has observed thus :

*(मा. उच्च न्यायालयाचा निर्णय – २६ परिच्छेदांचे तपशीलवार टिपण - परिच्छेद ९ पहा)*

**We direct respondent Nos.1 and 2 to apply their mind to find out whether the controversy is covered by the decision of this Court and pass an appropriate order.**

*( Hon'ble High Court Order dated 31st August 2020)*

***possessing the net-set examination,** M.Phil. and Ph.D. qualification. Only requirement is that the appointment of these lecturers is required to be made after following due selection process. The other requirement is that appointment of such lecturers ought to have been approved by the University and University should have submitted the proposal for grant of approval of such teachers to the University Grant Commission."* (P103NB2019)

९.१ नेमणुकीच्या दिनांकापासूनच या शिक्षकांची सेवा धरावी लागेल असेही स्पष्टपणे या निर्णयाच्या परिच्छेद ११ मध्ये आदेशित करण्यात आलेले आहे. ते पुढील शब्दात :-

"Needless to state that while making pensionary scheme applicable, the date of the appointment of the Petitioner shall be construed as 14th August 1995." (P103NB2019)

***मा. उच्च न्यायालयाचे एकूण ९ निर्णय***

१०. नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असे नमूद करणारे मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या वेगवेगळ्या खंडपीठांनी आतापावेतो नऊ निर्णय दिलेले आहेत. हे सर्व निर्णय, निर्णयाच्या तारखेनुसार पुढे नमूद केलेले आहेत.

**(1)** In the High Court of Judicature at Bombay : Civil Appellate Jurisdiction : Writ Petition No. 13166 of 2017 Shri Maruti Dattatraya Patil..Petitioner Vs. The State of Maharashtra and ors...Respondents. **Date of Judgment : 03rd October, 2018** *(Full Text of the Judgment is printed on page 120 of 2018 NUTA Bulletin.)*

**(2)** In the High Court of Judicature at Bombay : Civil Appellate Jurisdiction : Writ Petition No.1219 of 2017 Rekha Naresh Pulekar ..Petitioner Versus Shree Shiv Shahu Mahavidyalay, Sharud, Taluka Shahuwadi, District Kolhapur and others ..Respondents. **Date of Judgment : 19th October, 2018** *(Full Text of the Judgment is printed on page 137 of 2018 NUTA Bulletin.)*

**(3)** In the High Court of Judicature at Bombay : Bench at Aurangabad : Writ Petition No. 1304 of 2016 Sharda Rajendra Aajbe..Petitioner Versus State of Maharashtra and Others..Respondents. **Date of Judgment :12th December, 2018** *(Full Text of the Judgment is printed on page 25 of 2019 NUTA Bulletin.)*

**(4)** In the High Court of Judicature at Bombay : Civil Appellate Jurisdiction : Writ Petition No. 755 of 2019 Ranpise Vijaykumar Baburao...Petitioner V/S. The State of Maharashtra & ors.Respondents. **Date of Judgment : 9th April 2019.** *(Full Text of the Judgment is printed on page 103 of 2019 NUTA Bulletin.)*

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY**
**NAGPUR BENCH, NAGPUR.**

## LD-VC-CW NO. 1045 OF 2020.

(Smt. Jyoti Abhiman Makeshwar @ Ku. Jyoti Y. Khandare, Amravati Vs. State of Maharashtra & Ors.)
Shri P.S. Patil, Advocate for the petitioner.Ms. H.N. Jaipurkar, A.G.P. for respondent Nos.1 and 2.

**CORAM**
**R.K.DESHPANDE AND PUSHPA V.GANEDIWALA, JJ.**
**DATED : AUGUST 31, 2020.**

Hearing was conducted through Video Conferencing and the learned counsel for the parties agreed that the audio and visual quality was proper.

Issue notice for final disposal of the matter, returnable after eight weeks.

Ms. H.N. Jaipurkar, learned A.G.P. waives service of notice for respondent Nos.1 and 2.

The petitioner claims to have been appointed during the period from 23/10/1992 to 03/04/2000. The petitioner retired from service on attaining the age of superannuation with effect from 31/07/2019, however, the petitioner has not been paid pension on the ground that the petitioner did not acquire the qualification of N.E.T./S.E.T.

**According to the petitioner, the controversy is covered by the decision of the Division Bench of this Court rendered on 03/10/2018 in Writ Petition No.13166/2017 against which S.L.P. No.14703/2019 was dismissed on 01/07/2019.**

**We direct respondent Nos.1 and 2 to apply their mind to find out whether the controversy is covered by the decision of this Court and pass an appropriate order** which shall be communicated to the petitioner within a period of eight weeks from today. **If we find that the decision is contrary to the judgment delivered by this Court, heavy cost shall have to be imposed.**

This order shall be subject to the condition that the petitioner supplies the copy of the petition along with all annexures to the respondents within a period of two days from today.

This order be communicated to the learned counsel appearing for the parties, either on the email address or on WhatsApp or by such other mode, as is permissible in law.

JUDGE JUDGE

संदर्भ १ वर नमूद केलेला मा. उच्च न्यायालयाचा आदेश

**If we find that the decision is contrary to the judgment delivered by this Court, heavy cost shall have to be imposed.**

*( Hon'ble High Court Order dated 31st August 2020)*

**(5)** In the High Court of Judicature at Bombay : Bench at Aurangabad : Writ Petition No. 3293 of 2019 Shankar Bhagwanrao Deshmukh..Petitioner Versus The State of Maharashtra and Others..Respondents. **Date of Judgment :18/ 06/2019** *(Full Text of the Judgment is printed on page 16 of 2020 NUTA Bulletin.)*

**(6)** In the High Court of Judicature at Bombay : Bench at Nagpur : Writ Petition No. 2068 of 2019 Rajesh Vasantrao Pande..Petitioner Versus State of Maharashtra and Others..Respondents. **Date of Judgment : 29th July 2019.** *(Full Text of the Judgment is printed on page 134 of 2019 NUTA Bulletin.)*

**(7)** In the High Court of Judicature at Bombay : Bench at Aurangabad : Writ Petition No. 11316 of 2015 Bhanudas Vithalrao Kale...Petitioner V/S. The State of Maharashtra & ors.Respondents. **Date of Judgment : 28th August 2019.** *(Full Text of the Judgment is printed on page 02 of 2020 NUTA Bulletin.)*

**(8)** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench, Nagpur : Writ Petition No.7375 of 2019 : Petitioner : Sunil Pundlikrao Joshi Versus Respondents : (1) State of Maharashtra **Date of Judgment :** 9th July, 2020 *(Full Text of the Judgment is printed on page 86 of 2020 NUTA Bulletin.)*

**(9)** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench, Nagpur : Writ Petition No.7395 of 2019 : Petitioner : Sau. Vibha Ninad Saoji alias Ku. Vibha Laxman Umalkar, Versus Respondents : (1) State of Maharashtra, **Date of Judgment :** 9th July, 2020. *(Full Text of the Judgment is printed on page 87 of 2020 NUTA Bulletin.)*

**११.** संघटनेच्या कार्यालयात प्रत्यक्ष उपलब्ध असलेले हे निर्णय आहेत. यातील **पहिल्या प्रकरणात मा. खंडपीठाने दिलेला अर्थ प्रमाणभूत मानून पुढच्या आठही प्रकरणात मा.खंडपीठांनी आपले निर्णय दिलेले आहेत. तसे त्या प्रत्येक निर्णयात नमूद आहे. पहिल्या प्रकरणातील धोरणात्मक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने कायम केलेला असतांना, उच्च शिक्षण विभागातील अधिकारी बारंवार प्रत्येक शिक्षकाला उच्च न्यायालयात का पाठवितात व उच्च न्यायालयात निर्णय झाल्यानंतर कधी कधी मधूनच सर्वोच्च न्यायालयात काही बाबतीत विशेष अनुमती याचिका दाखल करण्याचा खेळखंडोबा कां करतात?** व असे करतांना कोण कोणते उद्योग करतात तसे करण्यामागे या अधिकाऱ्यांचे हेतू काय आहेत? हे फक्त ते अधिकारीच सांगू शकतील.

**१२.** मा. उच्च न्यायालयांनी दिलेले उपरोक्त परिच्छेद १० मध्ये नमूद केलेले निर्णय काळजीपूर्वक वाचले तर असे लक्षात येईल की, त्यामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण असे धोरणात्मक आदेश समाविष्ट आहेत. ते पुढीलप्रमाणे :-

**(1) "It can be thus seen that vide aforesaid G.R., the State Government has exempted the lecturers who are appointed between 23/10/1992 to 03/04/2000 and who were not possessing the net-set examination,** M.Phil. and Ph.D.qualification." (उपरोक्त परिच्छेद १० मधील पहिला निर्णय पहा.)

**(2)** "The facts in the present case are almost identical with the facts in Writ Petition No.13166 of 2017, which has been allowed by Division Bench of this Court vide judgment dated 3rd October 2018." (उपरोक्त परिच्छेद १० मधील दुसरा निर्णय पहा.)

**(3) "Government Resolution dated 27th June, 2013 has been interpreted by this Court at its Principal Seat in Writ Petition No. 13166 of 2017 under order dated 03rd October,**

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY**
**NAGPUR BENCH : NAGPUR**

## WRIT PETITION ST. NO.9649 OF 2020

(Smt. Jyoti Sadanand Banchare and others vs. State of Maharashtra and others) Shri P.S. Patil, Advocate for petitioners. Ms. H.N. Jaipurkar, Assistant Government Pleader for respondent nos.1 and 2.

**CORAM**
**R.K.DESHPANDE AND PUSHPA V.GANEDIWALA, JJ.**
**DATED : OCTOBER 12, 2020**

Hearing was conducted through Video Conferencing and the learned Counsel for the parties agreed that the audio and visual quality was proper.

2) Issue notice for final disposal of the matter, returnable after eight weeks.

3) Ms. Jaipurkar, learned Assistant Government Pleader waives service of notice for respondent nos.1 and 2.

**4) In the meantime, we direct respondent nos.1 and 2 to consider the decision of this Court delivered in Writ Petition No.13166/2017 on 3/10/2018 and decision of the Apex Court in Special Leave Petition (Civil) No.1309/2020 and take a final decision in the matter and file an affidavit to that effect before this Court. If we find that the decision to be taken by the respondent nos. 1 and 2 runs contrary to the decision of the Apex Court and this Court, heavy costs will be imposed.**

5) This order be communicated to the learned Counsel appearing for the parties, either on the e-mail address or on WhatsApp or by such other mode, as is permissible in law.

JUDGE JUDGE

संदर्भ २ वर नमूद केलेला मा. उच्च न्यायालयाचा आदेश

In the meantime, we direct respondent nos.1 and 2 to consider the decision of this Court delivered in Writ Petition No.13166/ 2017 on 3/10/2018 and decision of the Apex Court in Special Leave Petition (Civil) No.1309/2020 and take a final decision in the matter and file an affidavit to that effect before this Court.

*( Hon'ble High Court Order dated 12th October 2020)*

**2018."** (उपरोक्त परिच्छेद १० मधील तिसरा निर्णय पहा.)

**(4)** "The issue is no more res integra." (उपरोक्त परिच्छेद १० मधील चौथा निर्णय पहा.)

**(5) "The issue involved in the present matters is no longer resintegra** in view of the catena of judgments delivered by this Court. **Reference can be had to the judgment at the Principal Seat in Writ Petition No.13166/2017 decided vide order dated 3/10/2018. The said judgment has been followed in various matters."** (उपरोक्त परिच्छेद १० मधील पाचवा निर्णय पहा.)

**(6) "It is not in dispute that the facts involved in this petition are identical to those involved in Writ Petition No. 13166 of 2017 which has been decided on 3.10.2018 by the Division Bench of this Court at main seat. The said judgment has been confirmed by the Hon'ble Apex Court in SLP (C) No. 14703/2019 on 1.7.2019** when it dismissed the same." (उपरोक्त परिच्छेद १० मधील सहावा निर्णय पहा.)

**(7) "In view of these facts, it may be necessary for us to refer to the observations in the judgment and order dated 3rd October, 2018 and the same read thus:"** (उपरोक्त परिच्छेद १० मधील सातवा निर्णय पहा.)

**१२.१ उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी मा. उच्च न्यायालयांच्या निर्णयातील उपरोक्त मजकूर वाचला नसेल काय? वाचला असेल तर त्यांना तो समजला नसेल काय? याचे उत्तर ते अधिकारीच देऊ शकतील.**

**१३.** मा. उच्च न्यायालयाचे हे एकामागून एक निर्णय होत असतांना असे लक्षात येते की, '**आवड-निवड**' तत्वानुसार मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्याचा सपाटा या विभागाने सुरूच ठेवला होता. आतापावेतो मा. सर्वोच्च न्यायालयात राज्यशासनाच्या तीन विशेष अनुमती याचिका 'डिसमिस' झालेल्या आहेत. त्यांचे तपशील निर्णयाच्या तारखेनुसार पुढीलप्रमाणे :-

**(1) Supreme Court of India :** Record of Proceedings : Special Leave Petition (Civil) Diary No(s).14703/2019 (Arising out of impugned final judgment and order dated 03-10-2018 in WP No. 13166/2017 passed by the High Court of Judicature at Bombay) The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) Versus Maruti Dattatraya Patil & Ors. Respondent(s) **Date of Judgment : 01-07-2019** *(Full Text of record of proceedings is printed on page 117 of 2019 NUTA Bulletin.)*

**(2) Supreme Court of India :** Record of Proceedings : Special Leave Petition (Civil) Diary No(s).1076/2020 (Arising out of impugned final judgment and order dated 09-04-2019 in WP No. 755/2019 passed by the High Court of Judicature at Bombay) The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) Versus Ranpise Vijaykumar Baburao & Ors. Respondent(s) **Date of Judgment : 07-02-2020** *(Full Text of record of proceedings is printed on page 14 of 2020 NUTA Bulletin.)*

**(3) Supreme Court of India :** Record of Proceedings : Special Leave Petition (Civil) Diary No(s).1309/2020 (Arising out of impugned final judgment and order dated 29-07-2019 in WP No. 2068/2019 passed by the High Court of Judicature at Bombay Bench At Nagpur) The State of Maharashtra & Anr. Petitioner(s) Versus Rajesh Vasantrao Pande & Anr. Respondent(s) **Date of Judgment : 17-02-2020** *(Full Text of record of proceedings is printed on page 15 of 2020 NUTA Bulletin.)*

**१४.** मा. सर्वोच्च न्यायालयाने राज्यशासनाच्या तीन विशेष अनुमती याचिका फेटाळून लावतांना जे उपरोक्त आदेश पारित केले त्यांचा काळजीपूर्वक अभ्यास केला तर असे दिसून येते की, त्यातील

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY**
CIVIL APPELLATE JURISDICTION

## CONTEMPT PETITION NO. 535 OF 2019

Ranpise Vijaykumar Baburao...Petitioner. VERSUS Dr. Saurabh Vijay, The Principal Secretary State of Maharashtra & Others ...Respondents.

Mr. Devyani Kulkarni for the Petitioner. Mr. Rajendra Anbhule for Respondent No. 5. Mr. V. M. Mali, AGP for the Respondent-State.

**CORAM**
**R.K.DESHPANDE, & PRITHVIRAJ K.CHAVAN, JJ.**
**Date : March 9, 2020.**

P.C. :

**1.** The complaint in this petition is regarding non compliance or disobedience of the order dated 9th April 2019 passed by this Court in Writ Petition No.755 of 2019. The said decision was challenged before the Apex Court by filing SLP (Civil) No. 1076 of 2020 and it has been dismissed on 7th February 2020. The decision delivered by this Court has attained finality. However, till this date, the order has not been complied with and the Petitioner is not paid with the arrears of pension.

**2.** Issue notice before admission to the Respondents, returnable on 4 th May 2020. In the meantime, we provide an opportunity to the Respondents to purge the contempt. **If the order is not complied with, the Respondents will have to pay the cost of Rs.1,000/- per day for each day's default in making payment from the date on which judgment was delivered by this Court till this date.**

(PRITHVIRAJ K.CHAVAN, J.) (R.K.DESHPANDE, J.)

परिच्छेद १६ (i) मध्ये नमूद असलेले मा. उच्च न्यायालयाचे आदेश

**If we find that the decision to be taken by the respondent nos. 1 and 2 runs contrary to the decision of the Apex Court and this Court, heavy costs will be imposed.**

*( Hon'ble High Court Order dated 12th October 2020)*

**(i) पहिला आदेश** मा. सर्वोच्च न्यायालयाने पुढील शब्दात पारित केलेला आहे:-

"Delay condoned. In the facts and circumstances of the present case and **since the services of the first respondent were duly approved, we see no reason to entertain the Special Leave Petition.** The Special Leave Petition is accordingly dismissed."

**(ii) दुसरा आदेश** मा. सर्वोच्च न्यायालयाने पुढील शब्दात पारित केलेला आहे:-

"Delay condoned. **We are not inclined to entertain the Special Leave Petition under Article 136 of the Constitution of India.** The Special Leave Petition is accordingly dismissed."

**(iii) तिसरा आदेश** मा. सर्वोच्च न्यायालयाने पुढील शब्दात पारित केलेला आहे:-

"Delay condoned. **We are not inclined to entertain the Special Leave Petition under Article 136 of the Constitution of India.** The Special Leave Petition is accordingly dismissed."

**(iv)** पहिल्या आदेशात निश्चित कारण नमूद करून मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका खारिज केली आहे. दुसऱ्या व तिसऱ्या आदेशात मा.सर्वोच्च न्यायालयाने जे शब्द वापरले आहेत, त्या शब्दांचा अर्थ लक्षात न आल्यामुळे अजूनही उच्च शिक्षण विभागात Review व SLP दाखल करण्याचा खटाटोप सुरूच आहे.

**१५.** याबाबत मंत्रालयातील अधिकाऱ्यांचा उपरोक्त **'Review' आणि 'SLP' दाखल करण्याचा** खटाटोप चालूच आहे. हे मी अधिकृत कागदपत्रांच्या आधारे नमूद करू इच्छितो. दिनांक ५ मार्च २०२० रोजी राज्याच्या मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या शिष्टमंडळाला चर्चेसाठी बोलाविले होते. मी या शिष्टमंडळामध्ये सहभागी होतो. या चर्चेच्या वेळी उच्च शिक्षण खात्यातर्फे "**मा.मंत्रिमहोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ५ मार्च २०२० रोजी आयोजित महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या विविध मागण्यांसंदर्भातील बैठकीची टिपणी**" या मथळ्याची एक टिपणी विभागातर्फे तयार करण्यात आली होती. या टिपणीमध्ये क्रमांक १० वर "**२३ ऑक्टोबर १९९२ ते ३ एप्रिल २००० दरम्यान निवृत्त झालेल्या नेट-सेट मुक्त शिक्षकांना मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार जुन्या पेन्शन योजनेचे लाभ देण्याबाबत**" ही महासंघाची मागणी होती व त्या टिपणीमध्ये या मुद्यावरील मजकुराच्या शेवटी "मा.उच्च न्यायालयामध्ये सदर प्रलंबित याचिकांपैकी १५ याचिकांमध्ये शासनाच्या ध्येय धोरणाच्या विरोधात निकाल पारित करण्यात आलेले आहेत. **त्या निकालांच्या विरोधात 'Review' आणि 'SLP' दाखल करण्याची कार्यवाही सुरू असून त्यापैकी तीन याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावलेल्या आहेत,**" असे उच्च शिक्षण विभागाचे अभिप्राय नमूद करण्यात आलेले होते.

**(i)** उच्च न्यायालयाच्या दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ च्या पहिल्या निर्णयामध्ये उच्च न्यायालयाने दिलेल्या धोरणात्मक आदेशाच्या विरोधात आपण १५ वेळा अवमानाची कृती केलेली आहे, याचा अजिबात संकोच न बाळगता "मा.उच्च न्यायालयामध्ये सदर प्रलंबित याचिकांपैकी १५ याचिकांमध्ये शासनाच्या ध्येय धोरणाच्या विरोधात निकाल पारित करण्यात आलेले आहेत." असे वाक्य मंत्रालयात बसून लिहिणाऱ्या अधिकाऱ्याच्या बौद्धिक दिवाळखोरीमुळे त्यांचे काहीच नुकसान होत नाही, हा केव्हढा मोठा आधार या अधिकाऱ्यांना असतो.

**(ii)** संघटनेच्या दप्तरी नऊच निर्णय उपलब्ध असले तरी शासनाच्या निर्णयाच्या विरोधात निर्णय झालेल्या याचिकांची एकूण संख्या १५ आहे. हे या टिपणीतील अभिप्रायामुळे कळले.

**१६.** श्री. विजयकुमार रणपिसे प्रकरणात सहसंचालकांनी १४ जानेवारी २०१८ रोजी "**त्यांना जुनी पेन्शन योजना लागू होणार नाही,**" असे कळवून सेवानिवृत्ती वेतनाचे प्रकरण परत पाठविले. त्यामुळे श्री. विजयकुमार रणपिसे यांना उच्च न्यायालयात याचिका दाखल करावी लागली. सन २०१९ ची याचिका क्रमांक ७५५ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक ९ एप्रिल २०१९ रोजी त्यांच्या बाजूने निर्णय दिला. "हे प्रकरण कायद्याच्या दृष्टीने अगोदरच निकाली निघालेले प्रकरण आहे व पूर्व प्रकरणातील निर्णयाप्रमाणे या प्रकरणीसुद्धा जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल व नेमणुकीच्या तारखेपासून त्यांची सेवा धरावी लागेल" असा निर्णय दिनांक ९ एप्रिल २०२० रोजी झाला. वस्तुतः उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली नसेल तर त्या निर्णयाची अंमलबजावणी करणे शासनावर बंधनकारक असते. मात्र उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी त्या निर्णयाची अंमलबजावणी केली

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY**
**NAGPUR BENCH AT NAGPUR**

## CONTEMPT PETITION NO. 326/2019
## IN
## WRIT PETITION NO. 2068/2018 (D)

(RAJESH VASANTRAO PANDE VERSUS DR.SAURABH VIJAY, PRINCIPAL SECRETARY, STATE OF MAHARASHTRA & OTHERS)

Shri P.S. Patil, counsel for petitioner. Shri J.Y. Ghurde, A.G.P. for respondents.

### CORAM
### A.S. CHANDURKAR AND VINAY JOSHI, JJ.
### DATE : MARCH 02 , 2020.

Additional affidavit has been filed on behalf of the petitioner stating therein that on 17.02.2020, the special leave petition filed by the State of Maharashtra has been dismissed. In view of the fact that the pensionary benefits were to be paid to the petitioner by the end of October-2019, time of one week is granted by way of last chance to the respondent nos.2 and 3 to indicate as to when the said pensionary benefits would be paid to the petitioner. **It is noted that the period granted by this Court has already expired and hence the Court could consider awarding interest in lieu of belated payment.**

Stand over 09.03.2020.

**(VINAY JOSHI, J.)** **(A.S. CHANDURKAR, J.)**

परिच्छेद १७ (i) मध्ये नमूद असलेले मा. उच्च न्यायालयाचे आदेश

Department of Higher Education has **adopted a 'pick and choose' approach** in this matter. Department has extended the benefit of Old Pension Scheme to several Non-NET/SET Lecturers by taking into consideration services from the date of their initial appointment.

(See Para 5 of the letter dated 14.10.2020 from President NUTA to **The Principal Secretary,** Higher Education.)

नाही. सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल करण्यात आली. ही विशेष अनुमती याचिका मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ७ फेब्रुवारी २०२० रोजी फेटाळून लावली.

**(i)** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरसुद्धा उच्च शिक्षण विभागाने त्या निर्णयाची अंमलबजावणी केली नाही. तेव्हा श्री.विजयकुमार रणपिसे यांना उच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल करावी लागली. या अवमान याचिकेमध्ये दिनांक ९ मार्च २०२० रोजी मा. उच्च न्यायालयाने **"If the order is not complied with, the Respondents will have to pay the cost of Rs.1,000/- per day for each day's default in making payment from the date on which judgment was delivered by this Court till this date."** अशा अत्यंत कठोर शब्दात आदेश पारित केलेत. दिनांक ९ मार्च २०२० रोजीचे मा. उच्च न्यायालयाचे आदेशपत्र सोबत दिलेले आहे.

**(ii)** अवमान याचिकेत मा. उच्च न्यायालयाने उपरोक्त कठोर शब्दात आदेश पारित केल्यामुळे या प्रकरणी जुनी पेन्शन योजना लागू करणारे आदेश उच्च शिक्षण विभागाने दिनांक १५ जुलै २०२० रोजी निर्गमित केले. सारांश काय तर मा. उच्च न्यायालयाने धोरणात्मक पहिला निर्णय ३ ऑक्टोबर २०१८ रोजी दिल्यानंतर व तो निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयात कायम झाल्यानंतर सन २०१८ पासून तर ऑगस्ट २०२० पर्यंत श्री. विजयकुमार रणपिसे यांना उच्च शिक्षण विभागाच्या छळछावणीमध्ये छळ सहन करावा लागला.

**१७.** श्री. राजेश पांडे प्रकरणात सहसंचालकांनी २१ जानेवारी २०१९ रोजी **"त्यांना जुनी पेन्शन योजना लागू होणार नाही,"** असे कळवून सेवानिवृत्ती वेतनाचे प्रकरण परत पाठविले. त्यामुळे श्री. राजेश पांडे यांना उच्च न्यायालयात याचिका दाखल करावी लागली. सन २०१९ ची याचिका क्रमांक २०६८ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक २९ जुलै २०१९ रोजी त्यांच्या बाजूने निर्णय दिला. वस्तुतः उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली नसेल तर त्या निर्णयाची अंमलबजावणी करणे शासनावर बंधनकारक असते. मात्र उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी त्या निर्णयाची अंमलबजावणी केली नाही. सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल करण्यात आली. ही विशेष अनुमती याचिका सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १७ फेब्रुवारी २०२० रोजी फेटाळून लावली.

**(i)** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरसुद्धा उच्च शिक्षण विभागाने त्या निर्णयाची अंमलबजावणी केली नाही. तेव्हा श्री. राजेश पांडे यांना उच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल करावी लागली. या अवमान याचिकेमध्ये दिनांक २ मार्च २०२० रोजी मा. उच्च न्यायालयाने **"It is noted that the period granted by this Court has already expired and hence the Court could consider awarding interest in lieu of belated payment."** अशा शब्दात आदेश पारित केलेत. दिनांक २ मार्च २०२० रोजीचे मा. उच्च न्यायालयाचे आदेशपत्र सोबत दिलेले आहे.

**(ii)** अवमान याचिकेत मा. उच्च न्यायालयाने उपरोक्त आदेश पारित केल्यामुळे या प्रकरणी जुनी पेन्शन योजना लागू करणारे आदेश उच्च शिक्षण विभागाने दिनांक ३१ ऑगस्ट २०२० रोजी निर्गमित केले. सारांश काय तर मा. उच्च न्यायालयाने धोरणात्मक पहिला निर्णय ३ ऑक्टोबर २०१८ रोजी दिल्यानंतर व तो निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयात कायम झाल्यानंतर जानेवारी २०१९ पासून तर ऑगस्ट २०२० पर्यंत श्री. राजेश पांडे यांना उच्च शिक्षण विभागाच्या छळछावणीमध्ये छळ सहन करावा लागला.

**१८.** उच्च शिक्षण विभागातील सहसंचालकांची कार्यालये व मंत्रालयातील संबंधित अवर सचिवांचे कार्यालय यांनी आपल्या कार्यालयामध्ये ठोकळेबाज उत्तरे तयार करून ठेवलेली आहेत. मा. उच्च न्यायालयाचा निर्णय काहीही असो. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय काहीही असो. नेट-सेट मुक्त शिक्षकांचा सेवानिवृत्ती वेतनाचा प्रस्ताव आला की, त्या ठोकळेबाज पत्रामध्ये महाविद्यालयाचे नाव बदलावयाचे, शिक्षकाचे नाव बदलावयाचे, पत्राची तारीख बदलावयाची आणि **"दिनांक २७ जून २०१३ च्या शासननिर्णयानुसार सेवानिवृत्ती वेतन योजना लागू होत नाही,"** असे ठोकळेबाज उत्तर पाठविण्याचा धडाका सर्वच सहसंचालकांची कार्यालये मोठ्या उत्साहाने पार पाडीत आहेत. तिकडे अवर सचिवांच्या कार्यालयामध्ये मंत्रालयातील अवर सचिवांनी एक ठोकळा तयार करून ठेवलेला आहे. उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करून निर्णय मिळाल्यानंतर त्याची अंमलबजावणी करावयाची नाही, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झाल्यानंतरसुद्धा त्या निर्णयाची अंमलबजावणी करावयाची नाही, त्या शिक्षकाने अवमान याचिका दाखल केली की मग ठोकळेबाज आदेश पारित करावयाचा, या आदेशाच्या पहिल्या परिच्छेदामध्ये उच्च न्यायालयाने काय निर्णय दिला? याचे तपशील उधृत करावयाचे, दुसऱ्या परिच्छेदामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका फेटाळतांना काय नमूद केलेले आहे? ते उधृत करावयाचे, तिसऱ्या परिच्छेदामध्ये अवमान याचिकेच्या पहिल्या सुनावणीला उच्च न्यायालयाने काय आदेश दिलेत? ते उधृत करावयाचे व या ठोकळेबाज पत्राच्या शेवटी **"न्यायालयाच्या आदेशाचे अनुपालन करण्यात यावे"** असे सहसंचालकांना कळवावयाचे. गेली २-३ वर्षे हा ठोकळेबाज उद्योग अखंडपणे सहसंचालक व अवर सचिव पार पाडत आहेत. त्यांना उच्च न्यायालयाच्या निर्णयांचे तपशील वाचण्याची व समजून घेण्याची आवश्यकता वाटत नाही. सर्वोच्च न्यायालयाने "We are not inclined to entertain the Special Leave Petition under Article 136 of the Constitution of India." असा आदेश दिला. त्या आदेशाचा अर्थ काय होतो? हे समजून न घेता पुन्हा पुढच्या प्रकरणात विशेष अनुमती याचिका दाखल करावयाची, असा हा ठोकळेबाज उद्योग सुरू आहे.

### *मा. प्रधान सचिव यांच्यावर सोपविलेली जबाबदारी*

**१९.** आता या संदर्भात राज्याचे मा. प्रधान सचिव आणि विभागाचे सहसंचालक यांच्यावर जी जबाबदारी मा. उच्च न्यायालयाने सोपविलेली आहे, त्याबाबतची माहिती मी नमूद करू इच्छितो. दिनांक ३१ ऑगस्ट २०२० रोजी मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने LD-VC-CW No. 1045 of 2020 या प्रकरणात संदर्भ क्रमांक १ वर नमूद केलेला आदेश दिलेला आहे, त्यामध्ये **"याचिकाकर्त्यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजीच्या मा. उच्च न्यायालयाच्या सन २०१७ च्या याचिका क्रमांक १३१६६ या पहिल्या निर्णयाने हा वाद निकाली निघालेला आहे. त्यावर करण्यात आलेली विशेष अनुमती याचिका मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १ जुलै २०१९ रोजी फेटाळून लावलेली आहे."** अशा परिस्थितीत हा वाद संपुष्टात आलेला आहे किंवा नाही?

It is quite clear that the **Department of Higher Education has again adopted a 'pick and choose' approach** in the matter of challenges to the decisions of the High Courts in favour of the teachers. In some cases, the Department has challenged the decisions of the High Courts before Apex Court but in others, the decisions have been implemented without demur.

(See Para 5 of the letter dated 14.10.2020 from President NUTA to **The Principal Secretary,** Higher Education.)

**Government Resolution dated 27th June, 2013 has been interpreted by this Court at its Principal Seat in Writ Petition No. 13166 of 2017 under order dated 03rd October, 2018.**

*(मा. उच्च न्यायालयाचा निर्णय – २६ परिच्छेदांचे तपशीलवार टिपण - परिच्छेद ८ पहा)*

याचा निर्णय घेण्याची जबाबदारी मा. प्रधान सचिव, उच्च शिक्षण व सहसंचालक यांच्यावर मा. उच्च न्यायालयाने सोपविलेली आहे. ती पुढील शब्दात :-

**"We direct respondent Nos.1 and 2 to apply their mind to find out whether the controversy is covered by the decision of this Court and pass an appropriate order** which shall be communicated to the petitioner within a period of eight weeks from today. **If we find that the decision is contrary to the judgment delivered by this Court, heavy cost shall have to be imposed."** *(See Order referred at (1) above)*

**(i)** याबाबतीत मा. प्रधान सचिवांनी काय निर्णय घ्यावयाचा आहे? तर **"Whether the controversy is covered by the decision of this Court"** यावर निर्णय घेऊन प्रधान सचिवांना यथोचित आदेश पारित करावयाचे आहेत. मंत्रालयातील अधिकारी **"Whether the controversy is covered by the decision of this Court"** या शब्दरचनेकडे दुर्लक्ष करून **"Whether the Applicant is covered by the decision of this Court"** या अंगाने विचार करीत आहे, ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

**(ii)** संदर्भ क्रमांक ६ वर नमूद केलेल्या बैठकीमध्ये मी स्वतः सहभागी होतो. सदंर्भ क्रमांक १ व २ वर नमूद असलेल्या मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयातील महत्त्वाचा भाग मी वाचून दाखविला. प्रधान सचिव, उच्च शिक्षण हे या बैठकीला उपस्थित नव्हते. इतर अधिकाऱ्यांचा कल हा **"The Applicant is covered"** या अंगाने होता असे माझे निरीक्षण आहे. माझे निरीक्षण चुकीचे ठरल्यास मला आनंद होईल. **या निमित्ताने मा. प्रधान सचिव, उच्च शिक्षण यांच्या हे लक्षात आणून देण्यात येत आहे की, मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ च्या निर्णयाने "याचिकाकर्ते लाभान्वित होतात किंवा नाही?" या प्रश्नाचा निर्णय त्यांना करावयाचा नसून "त्या निर्णयाने वाद विषय संपुष्टात आलेला आहे किंवा नाही?" याबाबतचा निर्णय मा.प्रधान सचिवांना करावयाचा आहे.**

### *वाद विषय काय आहे?*

**२०. "Controversy"** या शब्दाचा अर्थ महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रसिद्ध केलेल्या "शासन व्यवहार कोश" या ग्रंथामध्ये **'वाद'** असा सांगितलेला आहे. संदर्भ क्रमांक १ व २ वरील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करावयाची तर मा. प्रधान सचिवांनी प्रथम **'वाद-विषय'** काय आहे? हे समजून घेणे आवश्यक आहे. नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत उच्च व तंत्रशिक्षण विभागाने काढलेल्या दिनांक २७ जून २०१३ च्या शासननिर्णयात परिच्छेद १५ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद नमूद आहे :-

"१५. **दिनांक २३.१०.१९९२ ते दिनांक ३.४.२००० या कालावधीतील ज्या बिगर नेट/सेट अध्यापकांनी यांच्या सेवाकालावधीत** विद्यापीठ अनुदान आयोगाने अधिव्याख्याता पदासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता (नेट/सेट/पीएच.डी/एम.फील) प्राप्त केली नाही. अशा अध्यापकांना खालील अटींच्या अधीन राहून **त्यांच्या सेवा सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यास शासन मान्यता देत आहे.**"

"**अशा अध्यापकांना खालील अटींच्या अधीन राहून त्यांच्या सेवा सदर शासननिर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यास शासन मान्यता देत आहे.**" त्यातील अटीविषयी कोणताही वाद नव्हता किंवा कोणाचा काहीही आक्षेप नाही. मात्र नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या बाबतीत २७ जून २०१३ रोजीच्या शासननिर्णयामध्ये "**त्यांच्या सेवा सदर शासननिर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ गृहीत धरण्यास शासन मान्यता देत आहे**" या वाक्याचा अर्थ काय होतो? याबाबत खरा वाद होता. त्यापायी अनेक शिक्षकांना न्यायालयात जावे लागले व त्याबाबतीत मा. उच्च न्यायालयाचे सर्वच्या सर्व निर्णय या शिक्षकांच्या बाजूने लागले.

### *वाद विषयाच्या उभय बाजूचे प्रतिपादन*

**२१.** वाद विषयाच्या उभय बाजूंचे मा. न्यायालयासमोर प्रतिपादन काय होते? हे प्रथम समजून घेणे आवश्यक आहे.

**(i)** शासनाचे म्हणणे असे की, "आम्ही हा शासननिर्णय २७ जून २०१३ रोजी काढलेला आहे. तेव्हा त्या दिवसापासून या शिक्षकांच्या सेवा सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यास मान्यता दिलेली आहे, त्यामुळे या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू होणार नाही तर त्यांना नवीन पेन्शन योजना लागू होईल."

**(ii)** या शिक्षकांचे व त्यांच्या संघटनांचे म्हणणे असे की, परिच्छेद १५ मधील "**त्यांच्या सेवा सदर शासननिर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ गृहीत धरण्यास शासन मान्यता देत आहे**" या वाक्याचा अर्थ शासन म्हणत आहे त्याप्रमाणे मान्य करावयाचा तर मग त्याच परिच्छेदातील "**दिनांक २३.१०.१९९२ ते दिनांक ३.४.२००० या कालावधीतील ज्या बिगर नेट/सेट अध्यापकांनी यांच्या सेवाकालावधीत**" या वाक्याला काही अर्थच उरत नाही. आमच्या नेमणुका १९९२ ते २००० या काळात झालेल्या असल्यामुळे आम्हाला जुनी पेन्शन योजना लागू होईल व त्यासाठी आमची सेवा नेमणुकीच्या दिनांकापासूनच धरली पाहिजे.

### *वादविषय मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाने निकाली निघाला*

**२२.** हा वाद मा. मुंबई उच्च न्यायालयासमोर आला व संदर्भ क्रमांक ३ वरील निर्णयाने मा. उच्च न्यायालयाने हा वाद निकाली काढला. मा. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणी (W.P.No. 13166/2017) दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी दिलेल्या पहिल्या निर्णयाच्या परिच्छेद ७ मध्ये शासनाचा २७ जून २०१३ चा संपूर्ण शासननिर्णय शब्दशः उधृत केलेला आहे व त्याबाबतचे खंडपीठाचे मत परिच्छेद ८ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद केलेले आहे.:-

**"It can be thus seen that vide aforesaid G.R., the State Government has exempted the lecturers who are appointed between 23/10/1992 to 03/04/2000 and who were not possessing the net-set examination,** M.Phil. and Ph.D.qualification. Only requirement is that the appointment of these lecturers is required to be made after following due selection process. The other requirement is that appointment of such lecturers ought to have been approved by the University and University should have submitted the proposal for grant of approval of such teachers to the University Grant Commission." *(P120NB2018)*

**(i)** या शिक्षकाची सेवा त्याच्या नेमणुकीच्या दिनांकापासून धरण्यात यावी असे मा.उच्च न्यायालयाच्या या आदेशाच्या परिच्छेद ९ मध्ये नमूद आहे. ते पुढील शब्दात :-

"Undisputedly, the Petitioners' appointment was made after

**It has been held by this Court that as per the said Government Resolution, the State Government has exempted the lecturers appointed between 23rd October, 1992 to 03rd April, 2000 from possessing the NET/SET qualification.**

*(मा. उच्च न्यायालयाचा निर्णय – २६ परिच्छेदांचे तपशीलवार टिपण - परिच्छेद ८.१ पहा)*

**The facts in the present case are almost identical with the facts in Writ Petition No.13166 of 2017, which has been allowed by Division Bench of this Court vide judgment dated 3rd October 2018.**

*(मा. उच्च न्यायालयाचा निर्णय – २६ परिच्छेदांचे तपशीलवार टिपण - परिच्छेद १२ पहा)*

following due selection process. Not only University as well as the Respondent -Joint Director of Education had also granted approval to the appointment of the Petitioner. **As such, it can be clearly seen that the Petitioner is entitled to the benefits of the said G.R. Undisputedly, the Petitioner's date of appointment is 20/9/1999 i.e. the date which falls between 23/10/1992 to 03/04/2000."**

### मा. सर्वोच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब झाले

२३. नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या सेवा २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाने नियमित केल्या म्हणजे काय केले? याबाबतच्या मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठांनी दिलेल्या निर्णयाकडे दुर्लक्ष करून राज्यशासनाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली पहिली विशेष अनुमती याचिका (SLP) सर्वोच्च न्यायालयाने 'डिसमिस' केली. त्याचे तपशील पुढीलप्रमाणे :- **(1) SLP No :** Special Leave Petition (Civil) Diary No(s).14703/2019. **(2) Arising out of** impugned final judgment and order dated 03-10-2018 in WP No. 13166/2017 passed by the High Court of Judicature at Bombay. **(3)** The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) **Versus** Maruti Dattatraya Patil & Ors. Respondent(s) **(4) Date of Order :** 01-07-2019. **(5) Coram :** Hon'ble Dr. Justice D.Y. Chandrachud Hon'ble Ms. Justice Indira Banerjee. **(6) Order :** Delay condoned. In the facts and circumstances of the present case and since the services of the first respondent were duly approved, we see no reason to entertain the Special Leave Petition. The Special Leave Petition is accordingly dismissed. Pending application, if any, stands disposed of. *(P117NB2019)*

२४. निकाली निघालेल्या वादविषयाबाबत मा. उच्च न्यायालयाच्या अनेक खंडपीठांनी निर्णय दिले. तीन प्रकरणांमध्ये विशेष अनुमती याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावल्या, परंतु उच्च शिक्षण विभागाचे ठोकळेबाज वर्तन काही दुरूस्त व्हायला तयार नाही. त्यामुळे आणखी एका तत्सम शिक्षकाला मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल करावी लागली. मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक १२ ऑक्टोबर २०२० रोजी Writ Petition ST. No.9649 of 2020 या प्रकरणात आदेश पारित केले असून त्यामध्ये पुढीलप्रमाणे आदेश आहेत :-

"In the meantime, we direct respondent nos.1 and 2 to consider the decision of this Court delivered in Writ Petition No.13166/2017 on 3/10/2018 and decision of the Apex Court in Special Leave Petition (Civil) No.1309/2020 and take a final decision in the matter and file an affidavit to that effect before this Court. **If we find that the decision to be taken by the respondent nos. 1 and 2 runs contrary to the decision of the Apex Court and this Court, heavy costs will be imposed."** *(See Order referred at (2) above)*

२५. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्रकरणात पण दुसऱ्या एका विषयावर मा. राजस्थान हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाला विशेष अनुमती याचिकेच्या द्वारे राजस्थान सरकारने मा. सर्वोच्च न्यायालयात आवाहन दिले होते. राजस्थान हायकोर्टाने तो निर्णय पंजाब व हरीयाणा हायकोर्टाच्या निर्णयाच्या (मा. सर्वोच्च न्यायालयात कायम झालेल्या) आधारावर दिलेला होता. राजस्थान सरकारची विशेष अनुमती याचिका मा. सर्वोच्च न्यायालयाने "In the Supreme Court of India Civil Appellate Jurisdiction : Civil Appeal No. 1123 of 2015 (Arising out of SLP(C) No.321 of 2015)" या प्रकरणात फेटाळून लावली. *(P153NB2015)* एकदा खालच्या न्यायालयात निर्णय झाल्यावर उगाचच लोकांना कोर्टात हेलपाटे देण्याच्या वृत्तीला राज्यशासनाने टाळले पाहिजे. ते राज्यशासनाचे कर्तव्य आहे. असे निरीक्षण मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १ जुलै २०१५ रोजी दिलेल्या या निर्णयाच्या परिच्छेद २० मध्ये स्पष्टपणे पुढीलप्रमाणे नमूद केलेले आहे :-

"It is the duty of the State Government to avoid unwarranted litigations and not to encourage any litigation for the sake of litigation. The respondents were entitled to get the benefit of pension and the High Court has placed reliance on the decision of another High Court which has already been approved by this Court."

२६. मा. प्रधान सचिव महोदय, मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या संदर्भ क्रमांक १ व २ वरील आदेशानुसार आपल्याला निर्णय करावयाचा आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या (MFUCTO) कार्यकारी मंडळाचा मी संस्थापक सदस्य असून सन १९७५ पासून म्हणजे स्थापनेपासून तर आजतागायत सातत्याने मी या कार्यकारी मंडळाचा सदस्य आहे. काही वर्षे मी या महासंघाचा अध्यक्ष म्हणून सुद्धा काम केलेले आहे. नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाचा (Nagpur University Teachers' Association - NUTA) सन १९७४ पासून तर सन २०११ पर्यंत अध्यक्ष म्हणून काम केलेले आहे. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेमध्ये सन १९८० पासून तर सन २०१० पर्यंत सातत्याने ३० वर्षे विधानपरिषद सदस्य म्हणून काम केलेले आहे. या सर्व कार्यकाळामध्ये **पहिल्या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेला धोरणात्मक निर्णय सर्वोच्च न्यायालयात कायम झाल्यानंतर व तीन प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका फेटाळल्यानंतर व त्या मूळ निर्णयाच्या आधारावर मा.उच्च न्यायालयाच्या ९ ते १५ खंडपीठांनी तत्सम निर्णय दिलेले असतांना पुन्हा पुन्हा उच्च शिक्षण विभागातील अधिकारी तोच तो ठोकळेबाज प्रकार सुरू ठेवतात, अशी बाब गेल्या ३०-४० वर्षांत पहाण्यात आलेली नाही.** संदर्भ क्रमांक ६ मध्ये नमूद केलेल्या बैठकीच्या वेळी हा विषय आपल्या समोर मांडता येईल असे मला वाटले होते. **पण त्या बैठकीला आपण उपस्थित नसल्यामुळे तसे मला करता आले नाही. म्हणून मी हे तपशीलवार टिपण आपणास सादर करीत आहे. याचा यथोचित विचार व्हावा अशी विनंती आहे.**

**- प्रा.बी.टी.देशमुख**
*माजी विधान परिषद सदस्य व*
*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

*****

***मा. उच्च न्यायालयाचे व सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय न वाचता, त्याचा अर्थ समजून न घेता, राज्यशासनाच्या अशा तीन विशेष अनुमती याचिका मा. सर्वोच्च न्यायालयात फेटाळण्यात आल्यानंतरसुद्धा एक एका शिक्षकाला न्यायालयात पाठविण्याचा ठोकळेबाज छळवाद अधिकाऱ्यांनी सुरूच ठेवला.***

*(२६ परिच्छेदांचे तपशीलवार टिपण - परिच्छेद २ पहा)*

# NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

B.P.T.A. Regn. NO. F-1564 &Soc.Regn.Act : Regn.No.MAH/15/73(NGP)

Affiliated to AIFUCTO and MFUCTO

**DR. P. B. RAGHUWANSHI,**
President
Buty Plot, Rajapeth Amravati (M.S.) - 444601

**To,**
**The Principal Secretary,**
Higher & Technical Education Department,
Mantralaya, Mumbai-32.

**Sub :** To take Policy Decision for releasing of pension to NON-Net/Set teachers who were appointed during periods of 23.10.1992 to 03.04.2000 in view of the Judgments of the Hon'ble Courts.

**Ref : (i)** Order of the Hon'ble High Court, Nagpur Bench in

**(A)** WP No.1045/2020 dated 31.08.20.

**(B)** W.P. ST No. 9649 of 2020 dated 12.10.2020.

**(ii)** Judgment of Hon'ble High Court (Bombay) in WP No.13166/2017 dt:03.10.18.

**(iii)** Judgment of the Hon'ble Supreme Court in SLP No.14703/2019 dt:01.07.19.

**(iv)** Govt. Resolution dt:27.06.13.

**Through :** The Joint Director, Higher Education, Amravati.

**Applicant :** Nagpur University Teachers Association (NUTA), Through its President, Shri Pravin B. Raghuwanshi. Mbl : 09834897593.

**Respected Sir,**

**1.** That in view of the above reference no. (i) (A), the Hon'ble Nagpur Bench of Bombay High Court has directed you to take decision within eight weeks in respect of entitlement of pension to a NON- net/set lecturer who were appointed during a period of 23.10.1992 to 03.04.2000.

**2.** That you are well aware that the issue in respect of grant of pension in favour of Non Net/ Set teachers who were appointed during the above said period is already settled by the Hon'ble High Court as per Ref no. (ii) and even SLP filed by the State is dismissed by the Hon'ble Supreme Court as per Ref no.(iii).

**3.** That the Hon'ble High Court in the above matter has passed a detailed judgment and by referring various policies and particularly GR dated 27.06.13 held that the teachers who were appointed during a period of 23.10.1992 to 03.04.2000 by following duly selection procedure and their services are approved by the Universities are eligible to get the old pension.

**4.** That thereafter the Hon'ble High Court has passed several judgments in Writ Petitions and granted relief to several similar teachers who were retired. Details of the Judgments delivered by different Hon'ble Benches (including the one referred at (ii) above) are as follows :-

**(1) W.P.No. 13166 of 2017 :** In the High Court of Judicature at Bombay. Date of Judgment : **03rd October, 2018.**

**(2) W. P. No.1219 of 2017 :** In the High Court of Judicature at Bombay. Date of Judgment : **19th October, 2018.**

**(3) W. P. No. 1304 of 2016 :** In the High Court of Judicature at Bombay : Bench at Aurangabad. Date of Judgment : **12th December, 2018.**

**(4) W. P. No. 755 of 2019 :** In the High Court of Judicature at Bombay. Date of Judgment : **9th April 2019**

**(5) W. P. No. 3293 of 2019 :** In the High Court of Judicature at Bombay : Bench at Aurangabad. Date of Judgment :**18/06/2019**

**(6) W. P. No. 2068 of 2019 :** In the High Court of Judicature at Bombay : Bench at Nagpur. Date of Judgment : **29th July 2019.**

**(7) W. P. No. 11316 of 2015 :** In the High Court of Judicature at Bombay : Bench at Aurangabad. Date of Judgment : **28th August 2019.**

**(8) W. P. No.7375 of 2019 :** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench, Nagpur. Date of Judgment : **9th July, 2020**

**(9) Writ Petition No.7395 of 2019 :** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench, Nagpur. Date of Judgment : **9th July, 2020.**

**5.** The record indicates that benefit of Old Pension has been extended by the Department of Higher Education to hundreds of Non-NET/SET Lecturers by taking into consideration service from the date of initial appointment. In fact, the record further indicates that the Department of Higher Education has **adopted a 'pick and choose' approach** in this matter. Department has extended the benefit of Old Pension Scheme to several Non-NET/SET Lecturers by taking into consideration services from the date of their initial appointment. But the same benefit was denied to so many of similarly situated teachers. It is quite clear that the **Department of Higher Education has again adopted a 'pick and choose' approach** in the matter of challenges to the decisions of the High Courts in favour of the teachers. In some cases, the Department has challenged the decisions of the High Courts before Apex Court but in others, the

***पहिल्या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेला धोरणात्मक निर्णय सर्वोच्च न्यायालयात कायम झाल्यानंतर व तीन प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका फेटाळल्यानंतर व त्या मूळ निर्णयाच्या आधारावर मा.उच्च न्यायालयाच्या ९ ते १५ खंडपीठांनी तत्सम निर्णय दिलेले असतांना पुन्हा पुन्हा उच्च शिक्षण विभागातील अधिकारी तोच तो ठोकळेबाज प्रकार सुरू ठेवतात, अशी बाब गेल्या ३०-४० वर्षांत पहाण्यात आलेली नाही.***

*(२६ परिच्छेदांचे तपशीलवार टिपण - परिच्छेद २६ पहा)*

decisions have been implemented without demur.

**6.** In the circumstances mentioned above, it is not surprising that out of several Judgments by the High Court, three Judgments were chosen for SLP in the Supreme Court. All the 3 SLP's were dismissed by the Apex Court. Details are as follows:-

**(1) Supreme Court of India :** Record of Proceedings : Special Leave Petition (Civil) Diary No(s).14703/2019 (Arising out of impugned final judgment and order dated 03-10-2018 in WP No. 13166/2017 passed by the High Court of Judicature at Bombay) The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) Versus Maruti Dattatraya Patil & Ors. Respondent(s) **Date of Judgment : 01-07-2019.**

**(2) Supreme Court of India :** Record of Proceedings : Special Leave Petition (Civil) Diary No(s).1076/2020 (Arising out of impugned final judgment and order dated 09-04-2019 in WP No. 755/ 2019 passed by the High Court of Judicature at Bombay) The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) Versus Ranpise Vijaykumar Baburao & Ors. Respondent(s) **Date of Judgment : 07-02-2020.**

**(3) Supreme Court of India :** Record of Proceedings : Special Leave Petition (Civil) Diary No(s).1309/2020 (Arising out of impugned final judgment and order dated 29-07-2019 in WP No. 2068/2019 passed by the High Court of Judicature at Bombay Bench At Nagpur) The State of Maharashtra & Anr. Petitioner(s) Versus Rajesh Vasantrao Pande & Anr. Respondent(s) **Date of Judgment : 17-02-2020**.

**7.** It is pertinent to note that after the directions issued by the Hon'ble Court in the above said matters, pension has been released in favour of all the teachers.It is pertinent to note that in all the matters you were party to the petitions and hence all the subordinate authorities should have followed same policy for all the teachers.

**8.** That once the issue has been settled by the Hon'ble Courts, the authorities should not refuse to grant pension to similar teachers and ought to have avoided undue harassment of teachers. **Moreover this act of the authorities of not following the directions of the Hon'ble Court is contemptuous.**

**9.** That despite of this the Joint Directors of Higher Education are refusing to release pension to every similar teacher by passing illegal orders and for that every teacher is approaching before the Hon'ble High Court and files writ petitions. **This act is nothing but an act of aggravation of the contempt and the authorities are expected to avoid such unnecessary litigations.**

**10.** That despite of several judgments of the Hon'ble Court such refusal to grant pension in favour of similarly situated lecturers by the authorities are illegal, arbitrary, discriminatory and violative of Art 14 of the Constitution of India.

**11.** Now may I take liberty to bring to your notice the directions given by the Hon'ble High Court in their orders referred at (i) (A) and (B) above :-

**(A) "We direct respondent Nos.1 and 2 to apply their mind to find out whether the controversy is covered by the decision of this Court and pass an appropriate order** which shall be communicated to the petitioner within a period of eight weeks from today. **If we find that the decision is contrary to the judgment delivered by this Court, heavy cost shall have to be imposed."** *(See Order referred at (i) (A) above)*

**(B)** "In the meantime, we direct respondent nos.1 and 2 to consider the decision of this Court delivered in Writ Petition No.13166/2017 on 3/10/2018 and decision of the Apex Court in Special Leave Petition (Civil) No.1309/2020 and take a final decision in the matter and file an affidavit to that effect before this Court. **If we find that the decision to be taken by the respondent nos. 1 and 2 runs contrary to the decision of the Apex Court and this Court, heavy costs will be imposed."** *(See Order referred at (i) (B) above)*

**12.** Hence in view of the above facts and the judgments of the Hon'ble Court it is requested to your good self to take policy decision and issue necessary directions for releasing of pension after the retirement to the Non- NET/SET teachers who were appointed during 23.10.1992 to 03.04.2000 and further avoid unnecessary litigations in the interest of justice.

Hence this representation.

**Mr. Pravin B. Raghuwanshi.**
President, NUTA.

**Amravati : Date : 14.10.2020**

**Copy To :** Joint Director of Higher Education, Amravati.

**The issue involved in the present matters is no longer resintegra in view of the catena of judgments delivered by this Court.**

*(मा. उच्च न्यायालयाचा निर्णय – २६ परिच्छेदांचे तपशीलवार टिपण - परिच्छेद १२ (५) पहा)*

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2018-20 (Uploaded on www.nuta.in on 21.10.2020) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 01.11.2020**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

To,...........................................................................

.....................................................................................

.....................................................................................

.....................................................................................